
श्रीज्ञानदेवांच्या २ व श्रीगुलाबराव महाराजांच्या १० ग्रंथांचे केलेले

# चित्तोपदेश

## अनुवाद





**अनुवादक**

मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजांचे उत्तराधिकारी

वेदान्तकेसरी श्री बाबाजीमहाराज पंडित


**अनुक्रम**

| | |
|---|---|
| **१.हरिपाठ** | **७** |
| **२.चांगदेवपासष्टी** | **२५** |
| **३.चित्तोपदेश** | **३८** |
| **४.भक्तिपदतीर्थामृत** | **६२** |
| **५.नित्यतीर्थ** | **१२४** |
| **६.निगमान्तपथसंदीपक** | **१४२** |
| **७.पाण्डुरंग चौसष्टी** | **१७२** |
| **८.प्रीतिनिर्तन (अपूर्ण)** | **१९५** |
| **९.स्वमतनिर्णयः (संस्कृत)** | **२६९** |
| **१०.कान्तकान्तावाक्यपुष्पम् (संस्कृत)** | **२९०** |
| **११.गोविंदानंदसुधा (संस्कृत)** | **२९६** |
| **१२.भक्तिसूत्र-अधिकरणन्यायमाला (संस्कृत)** | **३०८** |
| *१३.भगवद्भक्ति सौरभ (स्वतंत्र ग्रंथ उपलब्ध आहे)* | + |
| *१४.भगवद्गीता* | + |
| *१५.अमृतानुभव* | + |

श्रीगुलाबरावमहाराजांचे उत्तराधिकारी

**श्रीबाबाजीमहाराजांचे ग्रंथ**

| | |
|---|---|
| १. आर्यधर्मोपपत्ति | (रु.५०) |
| २. हरिपाठ-रहस्य | (रु.६०) |
| ३. अमृतानुभवकौमुदी | (रु.१५०) |
| ४. ज्ञाने.गूढार्थदीपिका | (रु.३००) |
| ५. अभंगगाथा | (रु.५०) |
| ६. विविध लेखसंग्रह | (रु.१५०) |
| ७. संतकथा | (रु.१५) |
| ८. पंचदशी प्रवचने | |
| ९. भागवत प्रवचने | |
| १०भगद्भाक्ति सौरभ | (रु.६०) |



## श्रीमहाराजांचे रूपवर्णन

पुण्यवृक्ष आजि फळलासे माझा ।  
माय ज्ञानेशजा देखियेली ॥  
अरुणप्रभेची ओतोनिया मूस ।  
रेखिले सुरस पादपद्म ॥  
कर्दळीच्या स्तंभासम जानुजंघा ।  
मृदुल सुरंगा शोभताती ॥  
कटिं पीतांबर उदरी त्रिवळी ।  
कुंकुमरेखा भाळी शोभतसे ॥  
सरळ नासिक सुहास्य वदन ।  
माथां कृष्णवर्ण वेणी शोभे ॥  
पांडुरंगनाथ सर्वांग सुंदर ।  
हृदय मंदिर शोभवीतु ॥

(श्री बाबाजीमहाराज पंडितांची गाथा अभंग.५)

*

*

श्रीबाबाजीमहाराज पंडित विरचित

## श्रीगुलाबरावमहाराजांची आरती

जयदेव जयदेव पांडुरंगनाथा ।  
आरती ओवाळिता हरली भवचिंता ॥धु०॥  
अनंत काळाची जीवाशिवा तुटी ।  
वारूनि उपाधी कराविशी भेटी ॥१॥  
भक्तिप्रेमपिसें साकारा आला ।  
साच केले एकाकी न रमते या बोला॥२॥  
भावे वंदितो मी सुकुमार पायां ।  
ज्ञानेश्वरकन्ये निवारावी माया ॥३॥  
जयदेव जयदेव पांडुरंगनाथा...... ॥धु०॥



श्री बाबाजी महाराज पंडित  
जन्म १२-१-१८८६ मकरसंक्रांत )



### श्रीगुलाबराव महाराजांच्या वाङ्मयीन मूर्तीचे शिल्पकार

## श्री बाबाजीमहाराज पंडित

''गुरुभक्तीची परी । सांगो गा अवधारी''

वयाच्या १९ व्या वर्षी चंद्रपूरचे नारायण पैकाजी पंडित प्रज्ञाचक्षु श्रीगुलाबराव महाराजांकडे आले. १९०५ मध्ये त्यांनी आई-वडिल घरदार शिक्षण वगैरे सर्व सोडून देऊन सद्गुरुसेवेस आरंभ केला. महाराजांचे कपडे धुणे, आंघोळीस पाणी देणे, स्वतः स्वयंपाक करून महाराजांना जेऊं घालणे वगैरे लहानमोठी सर्व प्रकारची कामे जीव ओतून केलीत. जणुं ज्ञानेश्वरीतील सद्गुरुसेवा मूर्तिमंत साकार झाली.

हरिभाऊ केवले, गंगाधर मुळे वगैरे ग्रंथलेखनिकांत ते होते. त्यांनी महाराजांची अगदि निरपेक्ष सेवा केली पण त्यांनी महाराजांना केव्हाच काहीहि मागितलं नाही. त्यांचे ते निर्व्याज आणि उत्कट प्रेम पाहून महाराजांनी उद्गार काढले -

''मी पंडिताला वश झालो आहे''

गुरुभक्तीनं ओथंबलेल्या अन्तकरणाला आणखी काय हवं असतं? शेवटच्या वेळी तर महाराजांनी आपण होऊन आशीर्वाद दिला -

''अरे पंडित, आजवर मी तुला काही दिलं नाही.  
माझे ग्रंथ वाच. तुला समजतील! ''

या अमोघ शब्दांनी 'ये हृदयीचं ते हृदयी सामावलं.' पंडितांचं सारं जीवनच उजळून गेलं. त्या सोज्वळ प्रकाशात महाराजांच्या ग्रंथांची सर्व हस्तलिखिते सूक्तिरत्नावलीच्या रूपाने प्रकाशित झालीत अन् पंडितांच्या अखंड परिश्रमांनी महाराजांची वाङ्मयीन मूर्ती साकारली. दृष्ट लागावं असं अक्षरशिल्प मुद्रांकित होऊन सर्वांना उपलब्ध झाल !

०००

श्रीबाबाजीमहाराज विरचित

## श्री पांडुरंगनाथस्तव

गर्भी मीं बहुदुःख सोसुनिहि ते जन्मास जालो जहीं ।
मोहामाजिं भुलोनियां विसरलों त्वद्दत्त मंत्रासही ॥
सेवोनि विषयां सुखें रमतसे सांडोनि त्वद्भावना ।
श्रीज्ञानेश्वरलालिते तव पदीं भावें करी वंदना ॥१॥
त्यागोनी वडिलांस नित्य रतलों स्त्रीपुत्रवित्तामधें ।
जाणीलें नच कीं अनर्थ कथिला भोगी तयांच्या बुधें ॥
मानीलें सकळांस तुच्छ पुजिलें नाही कधीं सज्जना ।
श्रीज्ञानेश्वरलालिते तव पदीं भावें करी वंदना ॥२॥
जन्मोनी रमणीय ब्राह्मणकुळीं वेदां न अभ्यासिलें ।
वेदोक्ता सकळा क्रिया समजुनी धर्मा न संपादिले ।
श्रेष्टांहीं उपदेशितां करितसें त्यांच्या सवे वल्गना ।
श्रीज्ञानेश्वरालालिते तव पदीं भावें करी वंदना ॥३॥
तारुण्यापगमें वरिलचि जरा कंटाळती सर्वही ।
की अंतीं यमयातना म्हणुनियां उद्वेग नोहे कहीं ।
झालें क्षीण शरीर हें परि तशी नोहे कदा वासना ।
श्रीज्ञानेश्वरललिते तव पदीं भावें करी वंदना ॥४॥
दैवें पाय तुझे दिसोनि मजला नाहीं कधी पूजिलें ।
नाहीं प्रेमभरें विनीत वचनें तोषा तुम्हां दीधले ।
आतां कोण गती कळे न पुढती होईल माझ्या मना ।
श्रीज्ञानेश्वरलालिते तव पदीं भावें करी वंदना ॥५॥
भोगावें याच देहीं फळहि परि तयाचें मियां मायबापा ।
राहो वाचे तुझे वा सतत शुभ असे नाम जे वारी तापा ।
होवो मद्हार्द-शुद्धि जळोनि सकळहि पातकें त्वद्वियोगें ।
श्रीपांडुरंगनाथा तव पदनुति वांचोनि ना कांही मागे ॥६॥

०००



# ‘सुखे म्हणो येती वेद’

## पाठक्रम व अर्थक्रम

वेदांचा पाठ करताना वैदिक संहितेचा पाठक्रम जसाचे तसा म्हटला जातो कारण ते मंत्र आहेत; परंतु ते वेदमंत्र समजून घेण्यासाठी आणि त्यांचा यज्ञादि कर्मात विनियोग करण्यासाठी त्यांचा अर्थक्रमानुसार अभ्यास अभिप्रेत आहे; त्यासाठी **ब्राह्मण ग्रंथ** आहेत.

मधुराद्वैताचार्य श्री गुलाबराव महाराजांचे धारणेनुसार श्री ज्ञानदेवांचा हरिपाठ हा वेदरूपच आहे. माउलीच्या मुखातून निघालेले समाधिभाषेतील आशीर्वादरूप मंत्र म्हणजे हरिपाठ !

वारकरीबंधूंनी नित्याचा नेम म्हणून करावयाचा हरिपाठ परंपरेनुसार पाठक्रमानेच करायला हवा; पण अर्थ समजून घेण्यासाठी श्रीगुलाबराव महाराजांनी सुचविलेला **अर्थक्रम** महत्वाचा आहे; आणि विशेष म्हणजे प्रत्येक अभंगात कोणता सिद्धान्त-विषय आलेला आहे ते सांगण्यासाठी श्रीगुलाबरावमहाराजांनी **‘‘प्रतिज्ञा’’** लिहिल्या आहेत.म्हणून अभ्यासूंच्या सोईसाठी प्रथम पाठक्रमानुसार अभंग नंतर प्रतिज्ञा व त्याखाली श्रीमत्सद्गुरु श्रीबाबाजी महाराज पंडितांच्या **‘‘हरिपाठरहस्य’’** ग्रंथातून सरलार्थ असा क्रम घेतला आहे.

*— प्रा. देवराव भुजाडे*

*अमरावती*

...........

# चित्तोपदेश

॥ श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

**॥ अथ चित्तोपदेशः प्रारभ्यते ॥**

**नमो देवदेवा कृपाळा गणेशा । नमो शारदा माउली ज्ञानदेशा ।**
**नमो सद्गुरु ब्रह्मरूपा ऽविनाशा । नमः (१) शंभू विष्णू रमोमानिवासा ॥१॥**
***(पाठभेद - (१) नमः सद्गुरु सज्जनानंतवेशा ॥)***

देवाधिदेवा कृपाळू अशा गणपतीला नमस्कार असो. ज्ञान देणारी परमेश्वरी शारदामाउली हिला नमस्कार असो. अखंड ब्रह्मस्वरूप अशा सद्गुरूला नमस्कार असो. पार्वतीसहित राहणाऱ्या शंकराला व लक्ष्मीसहित राहणाऱ्या विष्णूला नमस्कार असो. १

**मना सर्वदा शंकराते भजावे । मना सर्वदा कृष्णपाया पुजावे ।**
**मना सर्वदा सद्‌गुरु आठवावा । मना अंतरी देव तो साठवावा ॥२॥**

हे मना, सदासर्वकाळ शंकराचे भजन करावे. हे मना, सदा श्रीकृष्णचरणांची पूजा करावी. हे मना, सदासर्वदा सद्गुरूंचे स्मरण करावे. हे मना, अंतःकरणात भगवंताचे ध्यान करून हृदयात त्याला साठवावे.२

**मना स्नान ते जाह्नवी जीवनाचे । सदा सर्वदा सत्पदीं जीव नाचे ।**
**मना कृष्णिं घे जोडूनी जाइ नाते । अशावांचुनी संसृती जाइना ते ॥३॥**

हे मना, गंगोदकाने स्नान करावे. तेणेकरून अविनाशी अशा ब्रह्मपदी जीव राहतो. हे मना, श्रीकृष्णाशी कोणता तरी नातेसंबंध जोडल्याशिवाय संसार सुटत नाही.३

**मना विश्व हे सौख्य दुःखान्त आहे । असे जाणुनी अंतरी शांत राहे ।**
**मना मानुषी ही तनू दो दिसाची । म्हणूनी हरीची स्मरे मूर्ति साची ॥४॥**

हे मना, हे विश्व सुखदुःख यांनी युक्त आहे, असे समजून आपले चित्त स्वस्थ ठेव. हे मना, हे शरीर नाशिवंत आहे असे जाणून श्रीहरीच्या मूर्तीचेस्मरण करीत जा.



**सुधा ती नव्हे लाळ तूं जाण बापा । न कां जाणसी मूत्रपात्रप्रतापा ।**
**धनाच्या मुळे जीव गेले किती रे । मना यास्तव स्थान घे गांगतीरे ॥५॥**

हे मना, स्त्रियेच्या चुंबनात अमृत मिळत नाही तर ती लाळ आहे. बापा मना, स्त्रीच्या मोहामुळे किती हानी होते, हे कां तूं जाणून घेत नाहीस. संपत्तीच्या आसक्तीमुळे कितीतरी जीव अधोगतीस गेलेत असे समजून जाह्नवीच्या काठी रहा. (काशीवास कर.)५

**मना सर्वदा भोग ते रोग होती । मना सज्जना योगही दुःख देती ।**
**मना अंति रे नाहि कोणी कुणाचे । म्हणूनी प्रभूसी करी सख्य साचे ॥६॥**

अरे मना, विषयभोग रोगाला कारणीभूत आहेत. मना, हटयोगादि वगैरे मनाला क्लेशकारक आहेत. मना, अंतकाळी कोणी कुणाच्या कामी पडत नाही म्हणून भगवंताशी मैत्री कर.६

**मना या भवीं कष्ट घेता अनंत । परी भोग ते भेटती नाशिवंत ।**
**मना सज्जना काम दैवे भरावा । मना धर्म तो मात्र यत्ने करावा ॥७॥**

रे मना, या जगात कितीहि कष्ट केलेत तरी त्याचे फळ जे क्षणैक विषयसुख तें क्षणिकच असते. म्हणून संसार दैवावर सोडावा व परमार्थ मात्र यत्नपूर्वक करावा.७

**मना कृष्णनामीं जरि वाणि रंगे । चुकेना तरी कृष्ण होणे निजांगे ।**
**सख्या सोडूनी कामिनीमद् धनासी । हरी चिंतनीं ध्यास लावी मनासी ॥८॥**

अरे मना, तुझी जिव्हा नामस्मरणात दंग झाली (म्हणजे अखंड नामस्मरण घडले) तर तूं श्रीकृष्णस्वरूप झाल्याशिवाय राहणार नाहीस. सख्या, स्त्रीभोगाची व धनाची आासक्ती सोडून दे. भगवच्चिंतनाचा ध्यास मनाला लावून घे. ८

**जिने वागविले तुला गर्भि पोटीं । तुझ्यासाठीं सोसूनिया दुःख कोटी ।**
**जिने चिंतिले सर्व कल्याण तुझे । नमोनी तिचे पाय तूं वारि ओझे ॥९॥**

ज्या तुझ्या मातेने अनेक कष्ट सोसून गर्भात तुझे पालन केले व नंतरही जिने तुझ्या कल्याणाचीच इच्छा केली त्या मातेचे ऋण तिच्या पायांना नमस्कार करून ते फेड.९

**तुझेची तुला जोवरी हे कळेना । अहंता मना दैहिकीं जों गळेना ।**

**सख्या तोंवरी धर्म टाकूं नको रे । प्रतीतीविणें मुक्तिचे बोल कोरे ॥१०॥**

वर सांगितलेल्या तुझ्या कल्याणाचा हा मार्ग तुला जोपर्यंत कळत नाही व त्या मार्गाने जाउन देहाहंकार गळणार नाही तोपर्यंत तूं धर्माचरण सोडू नको. कारण अनुभवावांचून मी मुक्त झालो हे बोलणे व्यर्थ आहे. १०

**मना सज्जना शुद्धकर्मे करावी । मना अंतरी काळभीती धरावी ।**
**मना दुःख जाणोनी हो सावधान । यथाशक्ति दे याचकालागिं दान ॥११॥**

रे मना सात्विक कर्मे करावी व अंतःकरणात मृत्यूची भीती बाळगावी. जगात दुःख आहे हे पाहून तूं सावध हो व तुला जेवढे शक्य आहे तेवढे याचकाला दान करीत जा.११

**मना अंतरी ओळखुनी चिदंबा । नको भेद पाहूं कदा विष्णु-सांबा ।**
**मना इंद्रियें लावूनी कृष्णपायी । त्यजोनी अहंता त्वरें मुक्त होई ॥१२॥**

मना, आपल्या अंतःकरणात चैतन्यरूपी अंबेला जाणून घे. शिव-विष्णु यात भेद मानू नको (म्हणजे हरिहर हे दोन्ही एकरूप आहे हे विसरू नको) तूं अपली ज्ञानेंद्रिये व कर्मेंद्रिये भगवत्सेवेत लाव व मी देहाहून निराळा आहे हे जाणून मुक्त हो. **१२**

**जरी भेटती ना घरीं मुष्टि दाणे । तरी सोडिती कामिनी आणि तान्हे ।**
**सुखें बोलती ना न देती सुपाणी । म्हणूनी गड्या आठवी चक्रपाणी ॥१३॥**

जर घरी मूठभर धान्य नसेल व बायकामुलांना खावयास मिळाले नाही तर ते तुला सोडून जातील व सुखाने तुझ्याशी बोलणार नाहीत व पाणी मागितले तर तेहि धड देणार नाहीत, हे ओळखून बाबा भगवंताचे स्मरण कर. १३

**जिवापाड जे बा तुझे कष्ट घेती । तुला अंति ते एकटे पाठविती ।**
**मना हा तुला कां कळेना दगा रे । सदा संतसंगे उमानाथ गा रे ॥१४॥**

प्रपंचात तुझे आप्तेष्ट आपल्या सुखाकरिता तुला जिवापलीकडे कष्ट करावयास लावतात. पण शेवटी मृत्युसमयी तुला एकटेच पाठवितात. तुझ्याबरोबर कोणीही येत नाहीत. मना, तुला हा विश्वासघात कसा समजत नाही? बाबा, संतांच्या संगतीत राहून शिवाचे भजन कर.

**कसा बोलसी कामिनींना सुवाणी । मना रे कसा सोडिला चक्रपाणी ।**



**न ते ऐकसी सांगती संत वाणी । परंतु पुढे जीविता काळ वाणी ॥१५॥**

अरे, बायकोशी कशा गोड गोड गोष्टी करतोस पण भगवंतालाच मात्र तूं कसा आठवत नाहीस. साधुसत्पुरुषांच्या उपदेशाकडे तूं दुर्लक्ष करतोस पण समोर काळ हा तुझे आयुष्य हरण करीत आहे, इकडे तुझे लक्ष नाही. १५

**पती माय मामा सखे गोत्रबंधु । तुझ्या देखतां आटले शक्तिसिंधू ।**
**अझूनी कसा झोप घेसी गबाळा । उठे आठवी अंतरी नंदबाळा ॥१६॥**

तुझ्या देखत तुझे नातलग, माय-बाप व मोठमोठे बलवान लोक मृत्युमुखी पडले तरी अजून निष्काळजीपूर्वक तूं मूर्खासारखा झोपला आहेस ! आता तरी सावध हो व अंतःकरणात भगवंताचे स्मरण कर. १६

**समाधान तेथे मना सौख्यठेवा । समाधानियांचा सुरांनाहि हेवा ।**
**समाधान साधू भवी किंतु घेती । शिवा मेळवाया प्रयत्नीच होती ॥१७॥**

अरे मना, दैवाने मिळेल त्यावर संतुष्ट असणे यातच सुख आहे. अशा समाधानी वृत्तीच्या पुरुषांचा देवांनाही मत्सर वाटतो. परंतु सत्पुरुष संसारातच अशी समाधानी वृत्ती ठेवतात व आत्मप्राप्तिकरिता मात्र दैवावर विसंबून न राहता प्रयत्न करितात. १७

**शुका पंजरी भक्षिसी अन्नपाणी । परांसाठी तूं बोलसी गोड वाणी ।**
**स्वतंत्रा तुझी जाति पाहोनि कष्टी । कसा तुष्टसी खाउनी डाळ उष्टी ॥१८॥**

तुझी स्थिति पोपटासारखी आहे. पोपट जसा पिंजऱ्यात मालकाने दिलेले अन्नपाणी व डाळ वगैरे खावून सुख मानतो त्याप्रमाणे तूंही मी देह आहे व देहापुरताच मर्यादित आहे असे समजून विषयभोग भोगतोस व परांसाठी नातलगांशी गोडगोड बोलतोस. जसा पोपट स्वतंत्र असून टाकलेल्या डाळीवर सुखाने उपजिविका करतो त्याप्रमाणे तूं मुक्त असूनही मी बद्ध जीव आहे असे गृहित धरून विषयभोग भोगतोस. हे पाहून फार दुःख वाटते.१८

**तुला कान हे दीधले वासुदेवे । हरीचे तुवां गुण ते आयकावे ।**
**तुझी जीभ ही जाणते सौरसातें । पियावे तिने नाम सत्सौरसातें ॥१९॥**

अरे, हे तुझे कान भगवंताचे गुण ऐकण्याकरिता परमेश्वराने तुला दिले आहेत. तुझी ही जिव्हा मधुर रस सेवन करणारी आहे. तिने भगवंताचे नामस्मरण रूपी अमृत सेवन करावे.१९

**मना देव तो दूर कोठेंचि नाही । तुझा मीपणा टाकुनी त्यास पाही ।**
**तुझ्या अंतरी जे तुला जाणताहे । मना तेचि प्रत्यक्ष रे ब्रह्म पाहे ॥२०॥**

अरे मना, परमेश्वर दूर नाही. तूं आपला अहंपणा सोडून म्हणजे निरहंकार वृत्तीने त्याला पहा म्हणजे तुझ्या अंतःकरणात तुला जाणणारी जी वस्तु आहे ती वस्तूच परब्रह्म आहे. ''सर्व जीवांच्या हृदयदेशी । मी अमुका आहे ऐसी । जे बुद्धि स्फुरे अहर्निशी । ते वस्तु गा मी ॥''ज्ञाने.॥ २०

**बहुत विषय जाती जाणसी तूं मना रे । तुजसह विषयांतें जाणणें ज्या पुन्हा रे।**
**परमसुखद विष्णू तोचि तो ओळखावा । नमुनि गुरुपदाते चित्सुधागोळ खावा ॥२१॥**

हे मना, निरनिराळख विषयांचे ज्ञान तुला आहे पण तूं सुद्धा एक विषय आहे. तेव्हा तुझ्यासह विषयाला जाणणारे जे ज्ञान (साक्षीचे ज्ञान) आहे तोच निरतिशय प्रेम देणारा विष्णु असून त्याला तूं ओळखून घे व श्रीगुरूचे ठिकाणी नम्रता धारण करून श्रीगुरुपासून आत्मज्ञान प्राप्त करून घे.२१

**मना सज्जना संतसेवा करावी । मना पाउले सद्‌गुरूची धरावी ।**
**मना अंतरी शांतता पीकवावी । मना भक्ति लोकांस रे शिकवावी ॥२२॥**

हे मना,संतांची सेवा कर.श्रीगुरुचरणकमळी अत्यंत प्रेम कर. आपले चित्त स्वस्थ ठेव व लोकांना सन्मार्गास लाव.म्हणजे भगवद्भक्ती करण्यास प्रवृत्त कर.

**मना सर्वदा नीति पाळीत जावी । मना सर्वथा कुबुद्धी त्यजावी ।**
**मना काम क्रोधा नको देउं ठाव । धरी या जगीं सर्वदा साम्य भाव ॥२३॥**

हे मना, तू अपला व्यवहार नीतियुक्त कर. दुर्बुद्धीला जवळ करू नको. काम (विषयवासना) व क्रोध (विषयांचा द्वेष) सोडून दे. म्हण्जे रागद्वेषरहित रहा व या जगात समदृष्टीने वाग. २३



**मना सांडुनी दुर्जनांचा कुसंग । मुखे गा सदा सर्वदा पांडुरंग ।**
**मना लोभ तो जाण बा मूळ पापा । सख्या ओळखे विष्णुनाम प्रतापा ॥२४॥**

रे मना, ह्या जगात दुर्व्यसनी लोकांच्या संगतीत राहू नको व मुखने भगवंताचे नामस्मरण कर. लोभवृत्ती पापाचे मूळ आहे हे लक्षात ठेव. भगवंताच्या नामाचा महिमा जाणून घे. २४

**बहु भोजनाची नको प्रीति मोठी । भुके पुरती खाइजे डाळरोटी ।**
**विरक्तीपुढे स्वर्ग तो तुच्छ मानी । सदां तूं रमे वेदबुद्धि प्रमाणी ॥२५॥**

पुष्कळ जेवणाची आवड धरू नको म्हणजे युक्ताहार कर. जेवढी भूक असेल तेवढेच जेव. वैराग्यापुढे स्वर्गही तुच्छ समज. (म्हणजे स्वर्गाची कामना सोड) व तूं आपले आचरण वेदात सांगितल्याप्रमाणे ठेव म्हणजे धर्माने सांगितलेले विधि-निषेध पाळ. २५

**मना निश्चयाने मिळे सर्व कांही । मना निश्चय स्थापिजे विष्णुपायी ।**
**मना जें दिसे जाण तें सर्व खोटे । गुरूच्या पदा जाउनी शीघ्र भेटे ॥२६॥**

हे मना, निश्चयाने सर्व काही मिळते तेव्हा भगवत्प्राप्तीचा निश्चय कर. अरे बाबा, जेवढे काही दिसते ते खरे नसते कारण ''यदृष्टं तन्नष्टम्'' म्हणजे जे जे काही साकार दिसते ते सर्व मर्यादित काळ टिकणारे असते व नाशिवंत असते. हे जाणून अविनाशी वस्तू श्रीगुरुपाशी जाउन समजून घे. २६

**सख्या ब्रह्म रे तूं मूळींचा अहासी । अविद्यागुणीं तूं दरिद्रा बहासी ।**
**हरिभक्तीने मेळवी सद्‌गुरूते । गुरूची कृपा ब्रह्म ते दाखविते ॥२७॥**

अरे बाबा, तूं मूळचा ब्रह्मच आहेस. परंतु अज्ञानामुळे आपल्याला विसरून तूं मर्यादित व विनाशी समजतोस. भगवद्भक्ती करून श्रीगुरूची प्राप्ती करून घे, कारण विसरलेली आत्मस्थिती श्रीगुरूच प्राप्त करून देतात. २७

**तुला बोध व्हाया श्रुती शास्त्र सारे । तुला बोध व्हाया पुराणेही बारे ।**
**तुला बोधिती सर्वदा संतवाणी । तिथे चित्त ठेवी समाधान मानी ॥२८॥**

तुझे अज्ञान घालविण्याकरिता उपनिषदे व वेदान्तशास्त्र आहे,

त्याचप्रमाणे पुराणादिकातून तुला ज्ञान प्राप्त व्हावे हाच पुराणांचा हेतू आहे. साधुसंत जे आत्मज्ञान करून देतात ते छृढ करून घे व समाधान मान.२८

**मना या जनीं राहणे जों तुला रे । तरी बोधुनी भक्ति होई भला रे ।**
**दरिद्री धनी सारिखे सर्व मानी । भजोनी असत्या नको होउं मानी ॥२९॥**

मना जापर्यंत तुला याजगात रहावयाचे आहे किंवा जोपर्यंत तुझे आयुष्य आहे तोपर्यंत तू भ्मावद्भक्ती लोकांना शिकव. लोकांशी वागणुक समत्वाची असू दे. ज्या वस्तूची किंमत नाही त्या वस्तूचे माहात्म्य वर्णन करीत बसू नको. त्याचप्रमाणे लोकांमधे मानासाठी हपापू नकोस.

**मठाची नको रे उठाठेव काही । विरक्ति न तों मंदिरामाजिं राही ।**
**घरी राहुनी आठवी पांडुरंगा । यती होउनी इच्छिजेना स्त्रिसंगा ॥३०॥**

मठ स्थापन करण्याचा हव्यास नको. वैराग्य अंगी बाणलेले नसेल तर देशाटन करू नये. घरी राहूनच आत्मप्राप्तीचे साधन करीत रहा म्हण्जे नामस्मरण करीत रहा. परंतु संन्यास घेवून विषयभोगात चित्त ठेवू नको. ३०

**पळू जेवढा विष्णुवांचोनि जातो । मना काळही तेवढा तुष्ट होतो ।**
**नको वासना गुंतवूं नाशिवंती । यमाच्या घरीं पावशी अग्निं खंती ॥३१॥**

भगवच्चिंतना शिवाय जितका वेळ जातो तितका वेळ व्यर्थ जातो. मना, त्यामुळे यमाजीभास्कर संतुष्ट होतो आणि हा जीव यमपुरीस शिक्षा भोगण्यास पात्र होतो.विनाशी वस्तू किंवा विषयभोग यांच्या ठिकाणी आसक्त होड नको नाही तर शेवटी यमयातना भेगताना दुःख होईल. ३१

**मना जोंवरी इंद्रियांमाजी शक्ति । गड्या चित्तिं जों नाहि संसारसक्ति ।**
**जराग्रस्त जों जाहली नाहि काया । सख्या तों भजे कृष्ण सांडूनि माया ॥३२॥**

अरे मना, जोपर्यंत कर्मेन्द्रिये व ज्ञानेंद्रिये बलवान आहेत व चित्त संसारासक्त झाले नाही त्याचप्रमाणे शरीर रोगग्रस्त व वार्धक्याने जीर्ण झाले नाही तोंपर्यंत निष्काम भगवद् भक्ती करून घे. ३२

**भले द्रव्य तों बोलणे सर्व लोकां । पुसे ना कुणी पावल्या कर्मशोका ।**



**कुटुंबार्थ तूं पापकर्मे करीशी । यमाच्या घरी एकला रे भरीशी ॥३३॥**

जोपर्यंत तुझ्याजवळ पैसा आहे तोपर्यंत लोक तुझी वाहवा करतात. पण तुझ्या संकटकाळी कोणी उपयोगी पडत नाहीत. कुटुंबातील लोकांकरिता तूं वाटेल ते पाप करितोस पण यमाच्या घरी मात्र तूं एकटाच भोगत राहशील.३३

**मना सोडुनी सर्व संसार धंदा । सदा आवडीने भजावे मुकुंदा ।**
**गुरुपाउला देउनी प्रेमदान । असावे पुरे अंतरी सावधान ॥३४॥**

मना, सर्व संसारधंदा सोडून प्रेमयुक्त नामस्मरण कर व श्रीगुरुचरणी प्रेम समर्पण कर. अंतःकरण निर्मळ म्हणजे विकाररहित असूं दे.३४

**मना काम तो राम पाया नमाया । मना क्रोध तो इंद्रियांतें दमाया ।**
**मना लोभ तो ब्रह्मरूपी रमाया । *मना ज्ञानखड्गे निवारावि माया ॥३५॥**
**(* पाठभेद :- मना ज्ञानखड्गे निवारी स्वमाया ॥)**

मना, वासनाच जर आहे तर प्रभू रामचंद्राच्या चरणकमली वंदन करण्याची वासना ठेव. क्रोधच आहे तर इंद्रिये दमन करण्यात त्याचा उपयोग कर. लोभवृत्ती आहे तर ब्रह्मरूप होण्यात ती लाव. अज्ञान, अविद्या, भ्रम इत्यादि, आत्मबोध प्राप्त करून घेवून, दूर कर. (ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः।।) ३५

**मना बाहेरी मित्र विश्वा करावे । मना अंतरी मित्र वैरी नसावे ।**
**असावी दया दीन दुःखी जनांची । सदा आवडी विष्णुच्या पूजनाची ॥३६॥**

रे मना, लोकांशी वागताना मित्रभावाने वागावे व अंतःकरणात कोणाविषयी मित्र किंवा वैरभाव नसावा. दुःखी लोकांवर दया करावी. भगवंताच्या पुजेची नित्य आवड असावी. ३६

**मना देहसंगे हरेर्दास्य कीजे । मना जीवसंगे उमास्तन्य पीजे ।**
**स्वये होई तूं शंकर स्वात्मयोगे । नको घाबरूं वैभवाच्या वियोगे ॥३७॥**

हे मना, देह भगवंताच्या सेवेत लाव व जीव म्हणजे अशुद्ध चैतन्य असलेला तूं आत्मप्राप्तीकडे लक्ष लाव. मरेपर्यंत ब्रह्मज्ञानप्राप्तीचा मार्ग सोडू नको. अशा रितीने तूं शिवस्वरूप हो व क्षणिक वैभव नष्ट

झाले तर खेद मानू नको.३७

**मना सर्वथा सत्य सांडूं नकोरे । मना सर्वथाऽसत्य मांडूं नकोरे ।**
**मना आवडी ध्याइजे नित्य रामा । मना मंडुकी टाकुनी देइ रामा ॥३८॥**

रे मना, सद्वस्तू म्हणजे आत्मवस्तू सोडू नको. मायिक विषयांचे मागे लागू नको. प्रेमयुक्त अंतःकरणाने श्रीरामाचे स्मरण कर. स्त्रीसंभोगाची वासना सोडून दे.

**मना त्वां मुनी चाळवीले किती रे । मना घेतले जन्म नाहीं मिती रे ।**
**अझोनी तरी सोडि या सर्व खोडी । यमाच्या घरी तूं नको घेउं बेडी ॥३९॥**

मना, साधू सत्पुरुष महात्म्यांच्या उपदेशाकडे नेहमी तूं दुर्लक्ष करीत आला आहेस व जन्मफेरे भोगत आहेस. आता तरी ह्या वाईट संवयी (ऐकून न वागणे) सोड व यमपाश पडू देवू नकोस.३९

**भला होइ सांडूनि दुष्कर्म सारे । नको वित्तपुत्रार्थ होऊं पिसा रे ।**
**मना मृत्यु तोडिल रे त्वत्पिसारे । अझूनी गड्या नेणसी तूं कसा रे ॥४०॥**

दुष्कर्म म्हणजे वाईट आचरण करणे सोड व चांगला वाग. संतती व संपत्तीसाठी वेडा होउ नको. मृत्यू आला म्हणजे तुझे सर्व वैभव जेथल्या तेथे राहील. अजून तुला समज कशी येत नाही?४०

**मना विश्व हे बांधले कर्मसूत्री । सुखी दुःखी तूं पाहतोसी स्वनेत्री ।**
**सख्या जोवरी देहबुद्धी सुटेना । तरी घोर हा कर्मबंधु तुटेना ॥४१॥**

रे मना, हे विश्व कर्माधीन आहे व त्यामुळे सर्व जीव सखदुःख भोगतात. हे तूं डोळ्यांनी पाहतोस. जोपर्यंत 'मी देह आहे' ही बुद्धी नाहिशी होत नाही तोपर्यंत कर्मफळ भोगल्याशिवाय गती नाही. ४१

**यदा माधवाची कृपा पूर्ण होते । तदा सद्‌गुरु भेटती ज्ञानदाते ।**
**हरीप्रेम सांडूनि, बोधार्थ कष्टी । मना होति ते पावती नात्मतुष्टी ॥४२॥**

जेव्हा भगवंताची पूर्ण कृपा होते तेव्हा तुझी व आत्मज्ञान करून देणाऱ्या श्रीगुरूची भेट होते. जे लोक आत्मज्ञान भगवद्भक्तिविरहित प्राप्त करून घेतात त्यांना ब्रह्मानंद मिळत नाही. ४२

**भवाच्या भयें धावतां भक्तिसाठी । मना संत येऊनियां देति भेटी ।**
**यदा संत संगे मिळे सन्मती रे । उमाकांत दे तेधवां सद्‌गती रे ॥४३॥**



जे लोक संसारदुःखातून सुटावे म्हणून भगवद्भक्ती प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात त्यांना हे मना, संत सत्पुरुष स्वतः येउन भेटतात तेव्हा भगवान सद्गती देतो. (म्हणजे जेणेकरून उत्तरोत्तर प्रगती होईल अशी परिस्थिती निर्माण करतो) ४३

**मना दुष्टसंगेचि वागूं नको रे । मना अन्न ते गोड मागूं नको रे ।**
**मिळे त्यांत अत्यंत संतुष्ट राहे । यशोदासुता सर्वदा चित्ति बाहे ॥४४॥**

रे मना, दुष्टांच्या म्हणजे दुर्जनांच्या संगतीत राहू नको. मिष्टान्न खाण्याचा हव्यास धरू नको. जे काही प्रारब्धाने मिळेल त्यात संतोष मान व अंतःकरणात श्रीकृष्णाचे ध्यान सर्वदा करीत रहा. ४४

**मना दृश्य तें सर्व साधी अविद्या । मना सोडि हे मेळवूनी सुविद्या ।**
**सख्या जाणुनि अंतरी ब्रह्मरूपा । जना दाखवी भक्तीचा मार्ग सोपा ॥४५॥**

रे मना, जेव्हढे काही डोळ्याने दिसते ते सर्व मायिक आहे, हे आत्मज्ञान प्राप्त करून घेऊन समजून घे. (म्हणजे अद्वैत दृष्टीने द्वैताचा बाध कर.) अंतःकरणात सच्चिदानंद स्थिती दृढ कर. जगातील लोकांना भगवद्भक्तीचा सोपा मार्ग सांग. ४५

**मना काम तो सांडि सर्वस्व आधी । मना सोडिरे पुत्रदारा उपाधि ।**
**मना वंदुनी सद्गुरु संग साधी । मना आत्मरूपी जडावी समाधी ॥४६॥**

रे मना, विषयवासना मुळासकट नष्ट कर. सुत कांता ह्यांच्या ठिकाणी चित्त जडू देऊ नको. सद्गुरूच्या संगतीत निरहंकार वृत्तीने राहून आत्मस्वरूपाच्या ठिकाणी चित्त स्थिर कर. ४६

**मना ब्रह्म ते एक तूं सत्य पाहे । मना द्वैत तें सर्वही मिथ्य आहे ।**
**मना ज्ञानदेवाप्रती शीघ्र बाहे । मना साधुनी जीवब्रह्मैक्य राहे ॥४७॥**

रे मना, (ब्रह्मवस्तू) आत्मवस्तूच फक्त सत्य म्हणजे कधीहि न बदलणारी आहे. (म्हण्जे ती ७अपरिणामकारक आहे) द्वैत म्हणजे नामरूपे ही खोटी आहेत (म्हणजे मायिक आहेत) ''ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या'' नामरूपे आत्मसत्तेवर भासतात. आत्मसत्ता ही सत्य वस्तू व नामरूपे ही द्वैत निर्माण करतात म्हणून खोटी. हे मना, आत्मवस्तू म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांच्याकडे लवकर जा. मना आपले चित्त

सच्चिदानंदस्वरूप कर. ब्रह्माशी ऐक्य करून रहा.४७

**सख्या आठवूनी मनी पूतनारी । त्वरे वीसरे दैहिकी पुंसनारी ।**
**दिसे ते अधिष्टानिं लोपोनि बापा । जना तारुनी वारिजे पुण्यपापा ॥४८॥**

गड्या, श्रीकृष्णाकडे चित्त लावून पांचभौतिक स्त्री-पुरुष भेद विसर. जे काही या चर्मचक्षूने दिसते ते वरवरचे दिसते मूळ दिसत नाही. म्हणजे या जगताचे बीज म्हणजे अधिष्ठान लपवून भलतेच दिसते. त्यामुळे लोक भ्रमिष्ट होतात म्हणून लोकांचा उद्धार होईल असे कर. (लोक पाप-पुण्याच्या मागे लागणार नाहीत असे पहा व लोकांना शुद्ध ज्ञान व भक्तिमार्ग दाखव.)४८

**विवेके सख्या होइ तूं देहभिन्न । विरागे करी भोग ते सर्व छिन्न ।**
**मुमुक्षेमुळे तीव्र साधूनी संधी । कदापी पुढे ना पडे देहबंधी ॥४९॥**

गड्या, आत्मानात्मवस्तु विचार करून तूं निराळा आहेस, हे पक्के लक्षात घे. अनासक्ति-योगाने (वैराग्याने) विषयभोग सोड. मुमुक्षुत्व आंगी तीव्र बाणवून निर्विकल्प स्थिती साध म्हणजे पुढे देहरूप बंधाची स्थिती तुला मिळणर नाही. ४९

**मना जोंवरी होइना भोग वाणी । तरी बोलुनी काय वेदांत वाणी ।**
**गड्या मीपणा देहिंचा जो गळेना । परब्रह्म तें तो कदापी कळेना ॥५०॥**

रे मना, जोपर्यंत विषयभोगेच्छा कमी होत नाही म्हणजे सुटत नाही तोपर्यंत वेदान्त तोंडाने बोलून काही अर्थ नाही. गड्या, जोपर्यंत दैहिक अहंकार नाहीसा होत नाही तोपर्यंत ब्रह्मज्ञान अपरोक्ष (साक्षात्कार) होत नाही.

**कुठे काय आहे कुणी काय नेले ? तुझे वित्त तारुण्य हे यांत गेले ।**
**अझूनी तुला श्रीहरी बाहवेना । यमाचा पुढे दंड तो साहवेना ॥५१॥**

तुझा तारुण्याचा काळ ''कोठे काय आहे? कोणी काय नेले'' या उठाउठीत गेला. अजून तुला परमेश्वर कसा आठवत नाही? आयुष्य संपल्यावर यमयातना तुला सहन होणार नाहीत.

**मना इच्छिसी साधुपासोनी माना । मना साहसी कां स्त्रियांच्या ऽवमाना ।**
**मना देसिना धर्म तो मुष्टि दाणे । पुढे अग्निकुंडीं तुझी रे ऽवदाने ॥५२॥**



मना, साधुसंतांपासून मान मिळावा अशी तूं इच्छा करतोस. घरी बायकोने अवहेलना केली तर ती मात्र सहन करतोस. मना, तूं कंजूसपणा इतका करतोस की, कोणी धर्माने भिक्षा मागावयास आला की मूठभर दाणे देण्यासही तूं तयार होत नाहीस. पण पुढे तुझा देह (ज्याच्याकरिता ही सर्व जमवाजमव करितो) तो जीव गेल्यानंतर जाळल्या जातो.५२

**मना कृष्णदास्या तनू ही झिजावी । मति प्रेमरंगी हरीच्या भिजावी ।**
**भवाची नसावी सख्या भीति कांही । नुपेक्षी कदा कृष्ण राधार्धदेही ॥५३॥**

अरे बा मना, असे हे शरीर परमेश्वराच्या सेवेत लाव. मन भगवंताच्या प्रेमातरंगू दे. म्हणजे मग या संसाराचे तुला काही भय वाटणार नाही. श्रीकृष्ण परमात्मा तुझी उपेक्षा कधीहि करणर नाही. (तुझी अधोगती होऊ देणार नाही) ५३

**गुणातीतता जाणली आत्मयाची । सगुणी परी आवडी पूर्ण ज्याची ।**
**कदा नाठवी अंतरी दारमाचा । मना धन्य तो दास विश्वोत्तमाचा ॥५४॥**

भगवंताचे निर्गुण ज्ञान समजून घेऊन ज्याने भगवंताच्या सगुण स्वरूपाच्या ठिकाणी प्रेम केले व अंतःकरणात ककनक व कांता यांची आसक्ती धरली नाही असा भगवद् भक्त पुरुष धन्य होय. ५४

**मना खेळतां बाल्य ते सर्व गेले । मना यौवना योषितांनीच नेले ।**
**जरा ती पुढे दूति जाणे यमाची । कदा भेटि घेशील पुंसोत्तमाची ॥५५॥**

मना लहानपण सर्व खेळण्यात गेले व तरूणपण स्त्रियांच्या संगतीत गेले आणि पुढे यमाचे बोलावणे म्हणजे वार्धक्य आले तेव्हा अशा स्थितीत तूं पुरुषोत्तमाची भेट केव्हा घेशील?

**मना वित्तयोगे सदा साधु सेवी । मना चित्त ते कृष्णपादाब्जिं ठेवी ।**
**मना ब्रह्म जाणे गुरूच्या कृपेने । मना आत्मरूपी करी नित्य पेणे ॥५६॥**

अरे बाबा मना, धनाचा उपयोग साधूसत्पुरुष ह्यांच्या कामी कर. आपले चित्त भगवंतापाशी ठेव. (सगुण मूर्तीच्या ठिकाणी घ्यान लाव) म्हण्जे मग श्रीगुरूच्या कृपेने तुला ब्रह्मज्ञान होईल. तूं सदा सर्वकाळ आत्मानात्मवस्तुविवेक करण्यात वेळ खर्च कर.

**मना कर्म निष्काम दे चित्तशुद्धि । मना विष्णुभक्ति करी स्थिर बुद्धि ।**

**मना मुक्तिचा दायकू पूर्ण बोध । परंतु तिथेही हरिप्रेममोद ॥५७॥**

मना, चित्तशुद्धि निष्काम (फलासक्तिरहित) कर्माने होते. विष्णुभक्तीने बुद्धीच्या ठिकाणी धैर्य येते. ज्ञानाने मुक्ती मिळते. परंतु ज्ञानप्राप्तिनंतरही भगवद् भक्तीच्या आनंदाची आवश्यकता आहे. ५७

**मना तर्क योगे विकल्पू गळेना । मना शास्त्र-याथार्थ्य तेंही कळेना ।**
**म्हणोनी स्वनेत्रा मिटोनी सवेगे । भले चालती त्या पथे जाय वेगे ॥५८॥**

मना, मनातील विकल्प म्हण्जे नास्तिक्यबुद्धी तर्कटपणने दूर होत नाही. शास्त्रातील वाक्यांचा अर्थ बरोबर कळत नाही म्हणून साधुसत्पुरुष ज्या मार्गाने जातात त्या मार्गाचा अवलंब डोळे मिटून (श्रद्धेने) कर.५८

**मना कर्म ते काक* होऊनी येती । तिथे साम्यता सज्जनांची प्रतीती ।**
**सदा अंतरी रक्षिती रामनामा । कदा नेच्छिती द्योतना कामवामा ॥५९॥**
**(*सुख-दु:ख / काक = क + अक / क=सुख, अक=दु:ख)**

मना, जे काही पापपुण्यात्मक कर्म आपल्या हातून घडले असेल तेच सुखदु:खरूपाने आपल्या समोर येते. अशा सुखदु:खाच्या समयी सत्पुरुष धीर सोडत नाहीत. (म्हणजे न डगमगता दु:ख सहन करतात व सुखाने उन्मत्त होत नाहीत) असे सत्पुरुष आपल्या चित्तात रामनामाचे स्मरण करण्यास विसरत नाहीत व स्त्रीसंगाची कधीहि इच्छा करीत नाहीत. ५९

**मना अंतरी जों न वैराग्यठेवा । तरी मंदिरीं वासुदेव स्मरावा ।**
**भले लोक ते संगतीचे करावे । नको दुष्टसंगू जिथें धी दुरावे ॥६०॥**

मना, जर चित्तातून विषयवासना निर्मूळ झाली नसेल व रागद्वेषरहित अंत:करण झाले नसेल तर आपल्या घरीच नामस्मरण करीत रहा व सत्पुरुषांच्या संगतीतच रहा. जेथे दुर्बुद्धी उत्पन्न होईल अशांची संगत धरू नको.६०

**मना वाउगी चाउटी ते नकोरे । मना अंतरी व्यर्थ चिंता नकोरे ।**
**नको कांचनीं कामिनीं चित्त देऊं । सदा चिंतिजे रोहणीपुत्रभाऊ ॥६१॥**

मना, व्यर्थ बडबड करीत बसू नको. अंत:करणात व्यर्थ चिंता



करू नको. स्त्री व पैसा ह्यांच्या ठिकाणी लोभ करू नको. सदासर्वकाळ श्रीकृष्णचिंतनात जाऊ दे. ६१

**सदा सर्वदा देव कारुण्य झोकी । यमापासुनी सोडवी अंति जो की ।**
**जयाच्या कृपे योगियां मुक्तिठेवा । प्रभाते घन:श्याम चिंतीत जावा ॥६२॥**

परमेश्वर नित्य कृपावर्षाव करीत असतो व अंतकाळी यमाच्या जाचणीतून सोडवतो. ज्याच्या कृपेने योगी द्वैतबाधेतून सुटतात. (म्हणजे अद्वैत स्थिती प्राप्त करून घेतात.) त्या परमेश्वराचे चिंतन प्रत:काळी करीत जा.६२

**नको इच्छुं बा खेचरी भूचरी ते । नको रे मना पालखी बा करी ते ।**
**सदा रक्षि जो वारूनी दास गोवा । प्रभाते घन:श्याम चिंतीत जावा ॥६३॥**

खेचरी भूचरी मुद्रेची इच्छा करू नको. (म्हणजे योगसिद्धीच्या मागे लागू नको) मेणा वगैरे वैभवाच्या मागे लागू नको.जो परमात्मा आपल्या सेवकाला संकटातून सोडवितो त्याचे स्मरण प्रात:समयी करीत जा. ६३

**उठूनी बरा गात जा केशवाते । कदापि नको मी म्हणू या शवाते ।**
**विवेके हरी जाणुनिया भजावा । प्रभाते घन:श्याम चिंतीत जावा ॥६४॥**

आळस घालवून प्रभूचे गुणगायन करीत जा. कधीहि या शरीराला मी म्हणू नको. आत्मज्ञान प्राप्त करून घेऊन भगवद्भक्ती करावी व प्रभूचे चिंतन प्रात:काळी करावे. ६४

**मना 'बह्म मी' यापरी वृत्ति व्हावी । गुणातीतता आपली आठवावी ।**
**अनन्येपरी व्यक्त विष्णू भजावा । प्रभाते घन:श्याम चिंतीत जावा ॥६५॥**

मना, आपली चित्तवृत्ती 'मी ब्रह्म आहे' अशी करावी. (म्हण्जे 'देह मी आहे' ही जी आपली भावनाआहे ती काढून मी ब्रह्म म्हण्जे चैतन्य आहे, अशी भावना करावी) व ते चैतन्य त्रिगुणातीत म्हण्जे निर्गुण आहे हे लक्षात ठेवावे. व्यक्त म्हणजे सगुण भगवंताची भक्ती निरसीम व निष्काम करावी व अशा प्रभूला प्रात:समयी चिंतीत जावे. ६५

**मना साधतो योग हा आघवाची । मना चिंतिता पाउले राघवाची ।**
**जनाच्या भये देह तो न त्यजावा । प्रभाते घन:श्याम चिंतीत जावा ॥६६॥**

मना, हा योग म्हणजे ज्ञान व भक्तियोग तेव्हाच साधतो जेव्हा प्रभूच्या चरणांचे चिंतन घडते. जगाच्या भीतीने आत्महत्या करू नये. प्रातःकाळी विष्णूचे चिंतन करावे. ६६

**मना कामनेने सदा राम व्हावे । मना बोलणे सर्वदा नम्र व्हावे ।**
**मुखे सज्जनांच्या सुधाज्ञान पीजे । मना सर्वदा माधवी वस्ती कीजे ॥६७॥**

मना, रामस्वरूप होण्याची सदा इच्छा करावी. वाणी कधीहि कठोर नसावी.संतांच्या वाणीतून ज्ञानामृत प्राशन करीत जा. (आत्मज्ञान श्रवण करीत जा.) आपले चित्त भगवंताचे ठिकाणी स्थिर कर. ६७

**दुराशा नको पातके वांचण्याची ।** नको कामना स्त्री गृहीं नाचण्याची *।
**जनी निंद्य ते सर्व सोडूनी दीजे । मना सज्जना माधवी वस्ती कीजे ॥६८॥**
**(* पाठांतर = नको कामना कामिनी नाचण्याची)**

हातून पापे घडतील असे वर्तन करू नको. स्त्रियेच्या ठिकाणी चित्त राहील असे वागू नको. जगात ज्या निंद्य गोष्टी आहे त्या सोड व भगवंताचे ठिकाणी चित्त स्थिर कर. ६८

**मनारे कुडे सांडुनी सर्व कावे । भले सांगती त्या रिती आयकावे ।**
**दयेने मना दीनता नीववीजे । मना सज्जना माधवी वस्ती कीजे ॥६९॥**

हे मना, मनातील कपट काढून टाक व संत सांगतात प्रमाणे वाग. दीन दुबळे जे असतील त्यांच्यावर दया कर व भगवंताच्या ठिकाणी चित्त लाव.६९

**मना सर्वथा नीति सांडू नको रे । जनी दावी ना भक्तिचे ढोंग कोरे ।**
**वरिष्ठां सतां आवडी मान दीजे । मना सज्जना माधवी वस्ती कीजे ॥७०॥**

मना, न्याय-नीती कधी सोडू नको. जगात दांभिक भक्तीचा डांगोरा पिटू नको वडिल व सत्पुरुष यांच्याशी प्रेमयुक्त व्यवहार कर. मना, भगवंताच्या ठिकाणी ऐक्य कर.

**मना वाटते एधवां पा सोपे । पुढे कांपसी तूं यमाच्या प्रकोपे ।**
**अनूतापयोगे गुरु आठवीजे । मना सज्जना माधवी वस्ती कीजे ॥७१॥**

मना, सध्या पाप करणे तुला काही कठीण नाही. पण पुढे पापाचे फळ जेव्हा यमरज देतील तेव्हा मात्र तूं रडशील. म्हणून श्रीगुरूचे



स्मरण अंतःकरणपूर्वक कर व भगवंताशी तादात्म्य कर. ७१

**नको दोष पाहू कदा या जनाचे । सख्या दोष पाहूनि सांडि मनाचे ।**
**मना संतसंगेचि काल क्रमावा । प्रभाते घनःश्याम चिंतीत जावा ॥७२॥**

ह्या जगात कोणाचे दोष पहात बसू नको. गड्या आपल्या मनाचे दुर्गुण घालव. मना संताच्या संगतीत काळ व्यतीत करावा व प्रातःकाळी भगवच्चिंतन करावे. ७२

**धनाला तुझ्या लूटती लेकबाळी । तुझे साजिरे रूप ते अग्नि जाळी ।**
**मना सज्जना गर्व याचा त्यजावा । प्रभाते घनःश्याम चिंतीत जावा ॥७३॥**

तुझे धन मुलेमुली लुटतील. तुझे सुंदर शरीर अग्नीत जळून जाईल म्हणून धन व शरीर याचा गर्व सोडून देऊन प्रातःकाळी प्रभूचिंतन करावे. ७३

**जनी साधने दुष्ट, संकष्ट येती । बहूं देवता तत्फळे क्षुद्र देती ।**
**तयां टाकुनी चक्रपाणी पुजावा । प्रभाते घनःश्याम चिंतीत जावा ॥७४॥**

ह्या जगामधे सिद्धी प्राप्त करण्याची जी साधने आहेत त्यांच्या मागे लागण्याने फार कष्ट सहन करावे लागतात. ००द्धीसिद्धीच्या देवता क्षुद्र फळे म्हणजे नाशवंत फळे देतात म्हणून त्याच्या मागे न लागता श्रीविष्णूला भजावे व प्रातःसमयी त्याचे चिंतन करावे. ७४

**मना निर्गुणी ध्यान तेही जडेना । सगूणप्रभू प्रेम तो आवडेना ।**
**अशी हानि दो पक्षिंही ना करावी । सदा संगती सज्जनाची धरावी ॥७५॥**

निर्गुण, निर्विकार व निराकार अशा भगवंताच्या स्वरूपाच्या ठिकाणी चित्त जडत नाही व त्याच्या साकार स्वरूपाच्या भक्तीत मन रंगत नाही, अशा रितीने दोन्ही बाजूंनी नुकसान करून घेऊ नये. सदासर्वदा सत्संगती करावी (समर्थ म्हणतात - 'निर्गुण नेले संदेहाने । सगुण नेले ब्रह्मज्ञाने । दोहीकडे अभिमाने । ओस केले ।।) ७५

**मना खाटिकी * देह जो दूषिलाहे । अरण्यी तदा राहुनी सौख्य लाहे ।**
***पराधीनतासागरी नाप्लवीजे । मना सज्जना माधवी वस्ति कीजे ॥७६॥**
**(* खाटिकी = काम क्रोध इ. ६ शत्रूंनी. / (खाट = पलंग ?) / अरण्यी = वनात./ पराधीनता = इंद्रियाधीनता, इंद्रियलोलुपता./ इंद्रियाणि पराण्याहुः)**

मना, कामक्रोधविकारांनी हा देह जखडला गेला आहे म्हणून कामक्रोध सेडून दे. (निर्विकार स्थिती प्राप्त करून घेऊन) व तूं या अवस्थेत (अहं ब्रह्मास्मि या विद्या अवस्थेत) राहून सुखी हो. इंद्रियाधीन होऊन संसारात बुडू नको. व आत्मस्वरूपी निमग्न हो. ७६

**पराधीनता वाढवी पाप कोटी । पराधीनता ती बळे दुःखिं लोटी ।**
**पराधीनतेच्या विखे ना मरीजे । मना सज्जना माधवी वस्ति कीजे ॥७७॥**

इंद्रियाधीन राहण्यात म्हणजे विषयभोगात सुख मानण्यात रजोगुण बळावतो (रजसो लोभ एव च ॥ रजसस्तु फलं दुःखम् ॥ काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवाः। महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिहवैरिणम् ॥ गीता ३-३७) रजोगुण बळावला म्हणजे पापकृत्ये करवितो व दुःख भेगावे लागते म्हणून विषयविषाने मरू नको. भगवंताकडे चित्तलाव. ७७

**विरक्ती स्वये शिकवावी मनाते । विरक्ती नसे त्या गृहस्था जनाते ।**
पराधीनतोच्छेदका * दाखवावे । **परंतु हरी चिंतने शिकवावे ॥७८॥**
**(* पराधीनतोच्छेदका = पराधीनपणाचा जो उच्छेद, त्यापासून झालेल्या सुखाला)**

ह्या मनाला विषयात सुख नाही असे वळण लावावे. ज्या गृहस्थाला विषयासक्ती सुटत नाही त्याला विषयत सुख नाही असे सांगत रहावे व भगवंताचे चिंतन करण्यास लावावे. ७८

**पराधीनता तेचि वाईट घाणी । पराधीनतेला भले कोण मानी ।**
**कदा इंद्रियां आवडे ते न दीजे । मना सज्जना माधवी वस्ति कीजे ॥७९॥**

इंद्रियाधीन होणे (म्हणजे विषयलोलुप रहाणे) अत्यंत वाईट आहे. विषयलोलुपतेला कोण चांगले म्हणतात? म्हणून इंद्रियांना जे आवडते ते देऊ नये. (कारण ''इंद्रियाणि प्रमाथीनि हरति प्रसभं मनः । तानि सर्वाणि संयम्य ) भगवंताच्या ठिकाणी मन लाव. ७९

**मना सज्जनी निंद्य ते शीघ्र सोडी । मना सज्जनी वंद्य ते सर्व जोडी ।**
**तदा अंगिं ये योग्यता सज्जनाची । जिने ये न पाळी भवीं मज्जनाची ॥८०॥**

मना, जगामध्ये ज्या निंद्य गोष्टी असतील त्या तात्काळ सोड, ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्या सर्व करण्यस शीक. त्या योगे सज्ञनपणा अंगी येतो व त्यामुळे संसारात फजित होण्याची पाळी येत नाही.८०



**पुरे कां न वाटे तुला भोग अर्चा । पुरे वाटते कां तुला ज्ञानचर्चा ।**
***मना काम संग्राम सांडूनि द्यावा । प्रभाते घनःश्याम चिंतीत जावा ॥८१॥**
**(पाठान्तर- *कुडा कामसंग्राम सांडूनि दीजे । मना सज्जना माधवी वस्ति कीजे)**

अरे, भोग भोगणे तुला कां पुरे वाटत नाही? व ज्ञानचर्चा पुरे कां वाटते? (ज्ञानविषयक चर्चा डोकेदुखी होते व विषय भोगताना कसा आल्हाद, कसे सुख वाटते?) विषयवासनेची चढाओढ सोडून दे व प्रातःसमयी प्रभुचिंतन करीत जा.८१

**मना पूर्ण ते पुण्य अंगी भरेना । घडे पुण्य ते कामनेला पुरेना ।**
**मना रामनामी * विराम त्यजावा । प्रभाते घनःश्याम चिंतीत जावा ॥८२॥**
**(पाठान्तर - नामि रामा ८२)**

मना, शुद्ध पुण्य हातून होत नाही व जे काही पण्य होते ते विषयभोगात खर्च होऊन जाते. (यथासंग ते कर्म काही घडेना । घडे कर्म ते पुण्य गाठी पडेना- दासबोध.पुण्यात्मके पापे स्वर्गा जाईजे । पापात्मके पापे नरका जाईजे । मग माते जेणे पाविजे । ते शुद्ध पुण्य ॥ ज्ञाने.अ९.३१६) नामस्मरण करण्यात आळस करू नये. प्रातःसमयी प्रभुचिंतन करावे. ८२

**नको काम वा क्रोध वा लोभ गोवा । मना आवडी आठवा आठवावा ।**
**मना घे परब्रह्मरूपी विसावा ।*भाते घनःश्याम चिंतीत जावा ॥८३॥**
**(* पाठान्तर - जिभेला हरीपाठ तो पाठवावा ॥८३)**

काम (विषयवासना) क्रोध (विषयांचा द्वेष) ह्यांनी आपले चित्त मलीन होऊ देऊ नको वव श्रीकृष्णचिंतन कर. मनाची धडपड जी सारखी विषयप्राप्ती व त्यांच्या भोगांकडे असते ती न करता भगवंताच्या स्वरूपी मन लाव. मन भगवंताकडे मन लाव. (डोळां ते देखावे । कां कानी हन ऐकावे । मनी जे भावावे बोलावे वाचे ॥७६॥ ते आत बाहेरी आघवे । मीचि करूनी घालावे । मग सर्वकाळी स्वभावे । मीचि आहे ॥७॥ ज्ञाने.अ.८) प्रभुचिंन प्रातःकाळी कर.८३

**प्रभाते उमाकांत चिंतीत जावा । जिभेने उमाकांत आधी वदावा ।**
**सदाचार हा थोरसा वाढवीजे । मना सर्वदोमाधवी वस्ति कीजे ॥८४॥**

वाणीने शिवाचा जप करावा व चित्तात शिवाच्य मूर्तीचे ध्यान करावे. ही प्रक्रिया वाढवीत जावी व शिवस्वरूप व्हावे. ८४

**त्रिशूळे हरी शूळ भक्तोदरींचा । जया ध्यातसे कांतही इंदिरेचा ।**
**मना आदरे बिल्बपत्रे पुजावा । प्रभाते उमाकांत चिंतीत जावा ॥८५॥**

जो शिवभक्ताचे दुःख आपल्या त्रिशूळाने दूर करतो, त्या शिवाचे ध्यान विष्णु करीत असतात. अशा त्या शिवाला बिल्वपत्राने पुजावे व प्रातःकाळी त्याचे चिंतन करावे.८५

**अहंता धरी मानसा निर्गुणाची । करी क्षीणता देहिच्या मीपणाची ।**
**श्रुती सांगते त्या पथा आश्रयीजे । मना त्वां उमावल्लभीं वस्ति कीजे ॥८६॥**

हे मना, मी देह हा अहंकार क्षीण करण्याकरिता मी निर्गुण ब्रह्म आहे असा अहंकार धर. (म्हणजे जड देहाचे ममत्व व अहंता घालविण्याकरिता अहं ब्रह्मास्मि वृत्ती दृढ कर.) वेदाने सांगितलेल्या मार्गाने चाल. (वेदप्रणीत मार्ग सोडू नको) मना तूं शंकरस्वरूप हो. ८६

**मना सर्वथा द्वेषिती जे शिवाते । परंतु बरे पूजिती माधवाते ।**
**तयाते मिळेना कदा विष्णुभक्ति । म्हणोनी भजाव्या सदा दोन्ही व्यक्ती ॥८७॥**

जे शिवाचा द्वेष करितात परंतु विष्णूला भजतात त्यांना विष्णुभक्ती घडत नाही म्हणून हरि-हरांना समान भजावे. ८७

**तसे द्वेषिती इंदिरेच्या वराते । परंतु बरे पूजिती शंकराते ।**
**तयांना सदाशिव तो दुःखि पाडी । म्हणोनीच दोघांचीहि प्रीति जोडी ॥८८॥**

त्याचप्रमाणे जे विष्णूचा द्वेष करितात पण शिवाला भजतात त्यांना शिव दुःखात टाकतो म्हणून दोघांची अभेदभक्ती करावी. ८८

**हरी चिंतने सर्व कांही करावे । हरी चिंतने अन्न सेवीत जावे ।**
**गुरु आणि देवां समान स्मरीजे । मनारे उमावल्लभीं वस्ति कीजे ॥८९॥**

जे काही कर्म किंवा व्यवहार या देहाने करावा लागतो तो चित्तात हरीचे स्मरण करून करावा. (तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मरन् युद्धस्व च ।। - गीता. ह्या ठिकाणी युद्ध म्हणजे व्यवहार कर.) भोजन समयी भगवंताचे स्मरण करावे. गुरु व परमेश्वर ह्यांचे समान रूपाने चिंतन करावे. (यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ) अशा रितीने जीवशिवैक्य



करावे.) ८९

**सकाळी करूनी जळे शुद्ध गात्रे । स्वये आणुनी कोवळीं बिल्व पत्रे ।**
**तिहीं आवडी चंद्रमौळी पुजावा । प्रभाते उमाकांत चिंतीत जावा ॥९०॥**

प्रातःकाळी मुखमार्जनादि विधी आटोपून व कोवळी बिल्वपत्रे आणून भक्तियुक्त अंतःकरणाने शिवाची पूजा करावी व शंकराचे चिंतन करीत जावे. ९०

**मना देहसत्ये भजे आपणाते । मना रक्षिजे वाणिसत्ये जगाते ।**
**मना चित्तसत्ये सुधाज्ञान पीजे । मना त्वां उमावल्लभी वस्ति कीजे ॥९१॥**

रे मना, शुद्धाचार करून अत्मप्रीती करावी. जगात खरे बेलावे, खोटेनाटे बोलून व्यवहार करू नये. शुद्ध चित्ताने ब्रह्मज्ञान प्राप्त करून घ्यावे. मना, तूं शिवस्वरूप व्हावे.

**मना सद्गुरूची न कां चाड व्हावी । कुडी वासना कासया वाढवावी ।**
**बुधे जाच केवी यमाचा सहावा । प्रभाते उमाकांत चिंतीत जावा ॥९२॥**

मना, वाईट वासना न वाढविता सद्गुरूच्या ठिकाणी चित्त कां जडवू नये? (एकाग्रतेने सद्गुरूची सेवा करावी.) जर वाईट वसना वाढविल्या तर यमराजाकडे जावे लागेल वत्याचा जाच सहन करावा लागेल म्हणून प्रातःकाळी शिवाचे चिंतन करीत जावे.९२

**गुरुपाऊले नित्य घेतो उशाला । अशाला दुशाला मशाला कशाला ।**
**मनारे सदा संगही तोचि व्हावा । प्रभाते उमाकांत चिंतीत जावा ॥९३॥**

जे आपले चित्त सद्गुरूच्या चरणी जडवितो त्याला मोठ्या वैभवाची वगैरे गरज रहात नाही. रे मना, सदासर्वदा सद्गुरूंच्या संगतीत रहात जाऊन प्रातःकाळी शंकरचे चिंतन करीत जावे. ९३

**तुला दुःख ते ब्रह्मभिन्नाभिमाने । तुला जन्म-मृत्यु सदा वासनेने ।**
**म्हणोनी स्थिती आपुली ओळखीजे । मना त्वां उमावल्लभी वस्ति कीजे ॥९४॥**

तुला जे दुःख होते त्याचे कारण तूं आपल्याला ब्रह्माहून निराळे समजतोस म्हणून. तुला जनन व मरण तुझ्या वासनेने प्राप्त होतात. म्हणून तूं कोण आहे वगैरे हे आत्मज्ञान प्राप्त करून घे व आत्मरूपीं

स्थिर हो. ९४

**मना तूं मूळीं शार्दूलापोटिं आला । परा संगतीने कसा श्वान झाला ।**
**वृथाध्यास हा सर्व सोडोनि दीजे । मना त्वां उमावल्लभी वस्ति कीजे ॥९५॥**

मना, तुझा जन्म मोठ्यांच्या पोटी झाला पण क्षुद्राच्या (देह) संगतीने तूं आपल्याला क्षुद्र (देह) समजू लागला (ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः।।गीता) परा संगति म्हणजे प्रकृतीची संगति (जै अहंकार तनूसी । वालभ पडले ।। ज्ञाने.७.१६५) म्हणून मी क्षुद्र आहे म्हणजे मी देह आहे हा ध्यास सोड व जीवशिवैक्य कर.

**दिसे डोळियांलागि ते जाण माया । त्वरें जा पदीं सद्गुरूच्या नमाया ।**
**गुरु सांगती मार्ग तो रे धरावा । प्रभाते उमाकांत चिंतीत जावा ॥९६॥**

जेवढे काही या चर्मचक्षूने दिसते ते सर्व भ्रम उत्पन्न करणारे म्हणजे खोटे व नाशवंत दिसते. (चक्षुइंद्रियाशी युक्त झालेली अंतःकरणाची वृत्ती ही उत्पन्न होते व नाश पावते. कल्पना आहे तोपर्यंत ती वस्तू दिसते. कल्पना नसली म्हणजे ती दिसत नाही. म्हणजे मनाने त्या पदार्थाचा अकार धरला तोपर्यंत ते पदार्थ आहे. मन जसे चंचल तसे समोरचे पदार्थ चंचल म्हणजे नाशवंत आहेत. नित्य व सत्य वस्तू जी आहे ती ह्या चर्मचक्षूंनी दिसत नाही. (कारण- सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत् ।। जे दिसते ते माया म्हणजे अविद्यात्मक दिसते.) म्हणून सत्य वस्तु दाखविणारे जे श्रीगुरु त्यांना शरण जा. (ते ज्ञान पै बरवे । जरी मनी आथी आणावे । तरी संतां या भजावे । सर्वस्वेशी ।।ज्ञाने.अ.४) व ते जी आत्मप्राप्तीची प्रक्रिया सांगतील ती तंतोतंत पाळावी.याकरिता प्रातःकाळी शंकराचे चिंतन करीत जा. ९६

**जळो चित्त ते नोळखे ब्रह्म साचे । जळो ती तनू कीर्तनी जी न नाचे ।**
**जळो वित्त ते साधु सेवे न दीजे । मना त्वां उमावल्लभी वस्ति कीजे ॥९७॥**

ज्या चित्ताला ब्रह्माची ओळख झाली नाही ते चित्त व्यर्थ होय. (कारण ब्रह्मज्ञान ठसावले नाही तर जीव मृगजळाप्रमाणे विषयाधीन



होऊन अधेगतीस जतो.) जे हे शरीर भगवंताच्या गुणवर्णनाच्या वेळी देहभाव विसरत नाही ते व्यर्थ होय. जी धनसंपत्ती साधुसंतांच्या कार्यात खर्च होत नाहीती व्यर्थ आहे. म्हणून मना, तूं शंकराच्या ठिकाणी चित्त स्थिर कर. ९७

**घरींचे भ्रमे द्रव्य जेवी मिळेना । मुळी चुकले ब्रह्म तेवी कळेना ।**
**महावाक्यलक्ष्ये अहंता हरीजे । मना त्वां उमावल्लभी वस्ति कीजे ॥९८॥**

ज्याप्रमाणे आपल्या घरी असलेले धन आपण ठेवलेली जागा विसरल्यामुळे सापडत नाही त्याप्रमाणे मुळातच चुकीमुळे म्हणजे ब्रह्मस्वरूप विसरल्यामुळे ब्रह्म कळत नाही. ''अहं ब्रह्मास्मि, तत्त्वमसि'' इत्यादि महावाक्ये जाणून घे व मी देह आहे हा अहंकार सोड व शंकराच्या ठिकाणी आपले चित्त स्थिर कर. ९८

**मना निर्गुणा ज्ञानयोगे भजावे । सगूणाप्रति ध्यानयोगे पुजावे ।**
**निराकार साकार एकत्व कीजे । मना त्वां उमावल्लभी वस्ति कीजे ॥९९॥**

भगवंताच्या निर्गुण स्वरूपाचे आत्मज्ञान प्राप्त करून घेऊन सेवा करावी म्हणजे परमेश्वर सर्वत्र निराकार सर्वशक्तिमान व सर्वव्यापी आहे (अव्यक्तोऽयं अचिंत्योऽयं अविकार्योऽयम् उच्यते ।) हे जाणून त्याच्या ठिकाणी श्रद्धा ठेवावी तोच परमात्मा षड्गुणैश्वर्यसंपन्न, चैतन्यघन, साकारस्वरूप झाला (रामकृष्णादि रूपाने) असे समजून एकाग्र चित्ताने त्याची पूजा अर्चा करावी. अशरितीने त्या परमेश्वराचे निराकार व साकार स्वरूप जाणून भगवंताच्या ठिकाणी वृत्तीचा लय करावा व शंकराच्या ठिकाणी आपले चित्त स्थिर करावे. ९९

**मना अंतरी साधुनी शंभुदीक्षा । सदा सर्वदा सेविजे ज्ञानभिक्षा ।**
**अखंडात्मतादात्म्य योगो घडावा । प्रभाते उमाकांत चिंतीत जावा ॥१००॥**

अंतःकरणात वैराग्य धारण करून (निर्विषय चित्त करून) व आत्मज्ञान प्राप्त करून परमेश्वराशी नित्य तादात्म्य करावे म्हणजे चारही अवस्थात (जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तूर्या) जीवशिवैक्य टिकवावे. (वृत्ति विषयाकार होऊ देऊ नये) हे तेव्हाच घडते जेव्हा ज्ञानोत्तर भक्ती

घडते. प्रातःकाळी शंकराचे चिंतन करीत जावे. १००

**नको कांही आशा करूं मंचकाची । करी झाडणी भूतसंपंचकाची ।**
**परब्रह्मयोगे जगा तोषवीजे । मना त्वां उमावल्लभी वस्ति कीजे ॥१०१॥**

पलंग वगैरे सुखासनांची म्हणजे दैहि सुखाची आशा करू नके. पांचभैतिक शरीराहून मी निराळा आहे ही जाणीव दृढ कर. तूं सच्चिदानंद स्वरूप हो व या जगाला म्हण्जे विश्वाला सन्मार्गाला लावून सुखी कर. (विश्व ब्रह्मचि केले, अशी स्थिती कर) मना तू शंकराच्या ठिकाणी आपली वृत्ती स्थिर कर. १०१

**कृपे पाळी तै श्रीगुरु लक्ष्मीराणा । भवा बाधि तै शंकरू तोचि जाणा ।**
**म्हणोनी गड्या तत्पदाब्जाश्रयीजे । मना ज्ञानदेवी सदा वस्ति कीजे ॥१०२॥**

श्रीगुरु विष्णु होऊनच जगाचे पालन करितात व तेच शंकर होऊन जगाचा संहार करितात. म्हणून गड्या, त्यांच्या पदरूपी कमलांच आश्रय कर. श्रीगंरु ज्ञानेश्वरमहाराजांच्या ठिकाणी अंतःकरणाची वृत्ती नित्य राहू दे. १०३

*** मना सोडि रे मानकी जीवनाची । धरीं आवडी जानकीजीवनाची ।**
**करी पान विद्या सिताजीवनाचे । सदा ठेवूनी कीर्तनी जीव नाचे ॥१०३॥**

मना, आयुर्मर्यादा किती आहे याचा विचार करू नको. श्रीरामाच्या ठिकाणी प्रेम ठेव. (सिताजीवन म्हणजे श्रीराम) व ब्रह्मज्ञान प्राप्त करून घे. भगवंताच्या गुणवर्णनात चित्तवृत्ती रंगू दे. (देहबुद्धीचा विसर पडू दे.)

**तुझे कल्पिले विश्व स्वप्नासमान । पुन्हा तूं तयाला कसा देसि मान ।**
**गुरूच्या कृपे जाणुनि ब्रह्मबोधा । सख्या रे निवारी त्वरे द्वैतबाधा ॥१०४॥**

तुझ्या कल्पनेने निर्माण केलेले विश्व स्वप्नवत् आहे व तूं त्या विश्वाला कसा सत्य समजतोस? (सत्य समजून व्यवहार करतोस) श्रीगुरुपासून आत्मबोध प्राप्त करून घेऊन द्वैताची बाधा (नामरूपांची बाधा) दूर कर. (जग नाही, आहे तो सर्व चिद्विलास आहे हे ओळख)

**तुझा देह प्रत्यक्ष निर्जीव माती । तया मी असे मानिसी केवि चित्ती ?**
**त्यजोनी ममत्वा तुला त्वां भजावे । गुरूच्या कृपे शांतिसौख्यी निजावे ॥१०५॥**



तुझा देह प्रत्यक्ष जड माती (पृथ्वी आप वगैरे) आहे. अशा या देहाला 'मी' तूं कसे म्हणतोस? म्हणून ह्या देहाला मी व देहाचे संबंधी त्यांना माझे हे म्हणणे सोड. व श्रीगुरूच्या कृपेने शांतिसुख (अद्वैतसुख) मिळव. १०५

**जरी ब्रह्म संपन्न झालासी बापा । तरी तूं नको या करू भक्तिलोपा ।**
**जयाच्या कृपे जाणिली वेदवाणी । स्मरे तो सख्या सद्गुरु चक्रपाणी ॥१०६॥**

जरी तूं ब्रह्मज्ञानी झालास तरी भक्ती सोडू नको. ज्या सद्गुरूच्या (श्रीकृष्ण) कृपेने वेदांचे मर्म / ब्रह्मविद्या जाणली त्या सद्गुरु श्रीकृष्णाचे प्रेमपूर्वक स्मरण करीत रहा. (तैसी क्रिया कीर न साहे । परी अद्वैती भक्ती आहे)

*(*१०३ ते १०६ हे पदाच्या गाथेतले श्लोक आहेत)*

॥ हरि ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरु ज्ञानेश्वरार्पणमस्तु ॥

॥ चित्तोपदेशः समाप्तः ॥

विषयभाव वेगळा करून

**‘जारिणीचे परपुरुषीं मन ।**
**की विरहिणीचा विरह गहन ।**
**तो विषयभाव वेगळा करून ।**
**हरिरूपी प्रेमयोजन ते भक्ति’’ ॥१..४३॥**

‘‘जारिणी स्त्रियेचे परपुरुषावर जे प्रेम असते किंवा पतिव्रता स्त्रियेचे ठिकाणी स्वपतिविषयी जो थोर विरह असतो, त्या दोहोतील वैषयिकभाव नाहीसा करून जी केवळ शुद्ध प्रेमवृत्ति उरते, तशी शुद्ध प्रेमवृत्ति सगुण भगवंताचे ठिकाणी जडणे, याला भक्ति म्हणतात’’